१ **संक्षिप्त खटला क्र. २५४८०/२०२५**
**निशाणी—३**

**श्री. ओ.अ.माने, न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) यांचे न्यायालय, बेलापूर, नवी मुंबई.**

**गुन्हयाचा तपशिल**

संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक.२५४८०/२०२५ निशाणी—३
सरकार —वि.— श्री. राहुल राम पाटील.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | : | २६/०५/२०२५ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | २६/०५/२०२५ |
| ३. | फिर्यादीचे संपुर्ण नाव व पत्ता | : | **महाराष्ट्र सरकार मार्फत**<br>पोलीस स्टेशन, ए.पी.एम.सी, नवी मुंबई. |
| ४. | आरोपीचे संपुर्ण नाव व पत्ता | : | **श्री. राहुल राम पाटील.**<br>वय २८ वर्षे, धंदा — वडापाव विक्री<br>राहणार : एसएस—३, सेक्टर—१५,<br>कोपरखैरणे,. |
| ५. | (अ) अपराधाचा तपशिल | : | |

तुम्ही दिनांक २६/०५/२०२५ रोजी १४.३० वाजताचे सुमारास शालीमार हॉटेल समोरील चौकामध्ये सेक्टर—१९, वाशी, नवी मुंबई येथे सार्वजनिक ठिकाणी मानवी जिवीत धोक्यात येईल इतक्या हयगयीने ज्वालाग्रही गॅस सिलेंडर व शेगडीचा वडापाव व इतर खादय पदार्थ बनवून विक्री करीत असतांना मिळून आला व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता कलम २८७ नुसार गून्हा केला आहे.

वरील गून्हयासंबंधी तपशील आरोपीला मराठी भाषेत वाचून व समजावून सांगीतला.

OMKAR ARVIND SANE
Digitally signed by OMKAR ARVIND SANE
Date: 2025.07.29 17:30:52 +0530

**( श्री. ओ. अ. साने )**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**न्यायालय क्र.२, बेलापूर, नवी मुंबई.**

**बेलापूर**
**दिनांक : २९/०७/२०२५**

**आरोपीचा जवाब/म्हणणे**

प्रश्न १ : तुम्हाला पोलीसांनी दाखल केलेल्या खटल्याच्या प्रती मिळाल्या काय?

उत्तर : होय.

प्रश्न २ : तुम्हाला गून्हयाचा तपशील वाचून व समजावून सांगितला तो तुम्हाला समजला काय?

उत्तर : होय.

प्रश्न ३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर : मला गुन्हा कबूल आहे.

................................
आरोपीची सही/अंगठा.

आरोपीस विचारणा केली असता आरोपीने स्वत: होवून व स्वईच्छेने गुन्हा कबुल करीत असल्याचे सांगितले. त्याबाबत आरोपीने पुर्सीस दाखल केली. आरोपी स्वत: होवून गुन्हा कबुल करीत असल्याचे दिसुन आल्यामुळे आरोपीची कबुली स्विकृत करण्यात येते.

OMKAR ARVIND SANE Digitally signed by OMKAR ARVIND SANE Date: 2025.07.29 17:31:00 +0530

**( श्री. ओ. अ. साने )**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**न्यायालय क्र.२, बेलापूर, नवी मुंबई.**

**बेलापूर**
**दिनांक : २९/०७/२०२५**

**न्यायनिर्णय**
**(दिनांक २९/०७/२०२५ रोजी घोषित)**

१. ए.पी.एम.सी पोलीस ठाणे यांनी गु.रजि.नं. ३५९/२०२५ भारतीस न्याय संहिता कलम २८७ अन्वये आरोपीवर गुन्हा दाखल करून मा. न्यायालयात हजर केले आहे. सदरचा गुन्हा आरोपीस कबूल आहे. आरोपी कोणत्याही दाबावाखाली सदर गुन्हयाची कबूली देत नाही असे मान्य करत आहे. सदरच्या गुन्हयाची कबूली तो स्वइच्छेने देत आहे.

२. आरोपीने मा. न्यायालयास विनंती केली आहे की, तो त्याच्या कुटूंबाचा एकमेव कर्ता पुरुष असल्याने त्याला दया दाखविण्यात यावी व कमीत कमी दंडाची शिक्षा करण्यात यावी. तरी सदर गुन्हयाचे स्वरूप व आरोपीची विनंती पाहता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे:

**: आदेश :**

१. आरोपीस भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २५२ नुसार शिक्षा देण्यात येत आहे. आरोपीस भारतीय न्याय संहिता कलम २८७ नुसार सदर न्यायालय उठेपर्यंत व रूपये ५००/— (रुपये पाचशे फक्त) दंडाची शिक्षा करण्यात येते. दंड न भरल्यास आरोपीस ५ दिवसांची साधी कैद ही शिक्षा देण्यात येत आहे.

२. सदर न्यायानिर्णयाची प्रत विनामुल्य आरोपीस देण्यात यावी.

OMKAR ARVIND SANE Digitally signed by OMKAR ARVIND SANE Date: 2025.07.29 17:31:07 +0530

**( श्री. ओ. अ. साने )**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**न्यायालय क्र.२, बेलापूर, नवी मुंबई.**

**बेलापूर**
**दिनांक : २९/०७/२०२५**